# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/08/2023 (शनिवार) सायंकाळ

---

### जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत १६ कि. मी अंतरावरील मौजा पिरावा ता. भिवापूर जि. नागपूर येथे दिनांक ०४/०८/२०२३ चे १७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— बापुराव लोलबा गायकवाड, वय ७५ वर्ष, रा. पिरावा ता. भिवापूर जि. नागपूर व आरोपी नामे— कमलाकर मोतीराम रंधई, वय ४२ वर्ष, रा. पिरावा ता. भिवापूर जिल्हा नागपूर हे एकाच गावात राहणारे असुन एकमेकांना ओळखतात. फिर्यादी व आरोपी यांचे ७ वर्षा अगोदर झगडाभांडण झाले होते. तेव्हा पासुन आरोपी हा फिर्यादी सोबत झगडा भांडण करण्याचा प्रयत्न करित होता. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे गावातील हनुमान मंदीराजवळील ओटयावर बसुन गावातील सुभास समर्थ याचे सोबत बोलत असतांना आरोपी तेथे आला व फिर्यादीस शिवीगाळ करु लागता फिर्यादीने त्यास समजवण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने त्याच्या जवळील चाकु काढुन ''थांब तुझा आता जिवच घेतो'' असे म्हणुन चाकु फिर्यादीच्या छातीवर मारला तो चाकु छातीत घुसला, पुन्हा चाकु मारत असतांना फिर्यादिने तो उजव्या हाताने पकडला तर हाताला जखम झाली. तेंव्हा आरोपीने '' आज तर तुझा मुडदाच पाडतो'' असे म्हणत फिर्यादीला चाकुने भोसकुन जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ५०४, ५०६ भादवी. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिनेश खोटेले, पोस्टे उमरेड मो. नं. ९४०४०८०६६६ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा कलंभा शेत शिवार येथे दिनांक ३०/०७/२०२३ चे २३/०० वा. ते दिनांक ३१/०७/२०२३ चे ०४/०० वा. सुमारास फिर्यादी नामे— रोशन रमेश मसराम, वय ३२ वर्ष रा. पंचवटी काटोल हे कनिष्ट अभियंता महावितरण कंपनी येनवा येथे नौकरीवर असुन यातील फिर्यादीस दि. ३१/०७/२०२३ रोंजी दुपारी ०२/०० वा .येनवा येथे राहणारा लोमस भिकुदेव गातार याने फिर्यादीला फोनदवारे माहीती दिली की कलंभा शेत शिवारात लावलेले एकुण लघुदाब वाहीनीचे अकरा पोल तोडुन त्यावरील २००० मीटर अंतर असलेली विदयुत वाहीनीचा चार पदरी अॅल्युमिनीयम तार दिसत नाही. असे सांगितल्याने फिर्यादीने तेथे जावुन पाहीले असता फिर्यादीस कलंभा शेत शिवारात लावलेले एकुण लघुदाब वाहीनीचे अकरा पोल तोडुन त्यावरील २००० मीटर अंतर असलेली विदयुत वाहीनीचा चार पदरी अॅल्युमिनीयम तार किंमती ४०,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोना वंदना खेडकर मो. नं. ९९२२५६१८४६ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**